## आजचे पंचांग

दिनांक : ८ ऑगस्ट २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : दशमी तिथी (दुपारी ०१:५९ पर्यंत) त्यानंतर एकादशी तिथी नक्षत्र : रोहिणी नक्षत्र (दुपारी ०४:५० पर्यंत) त्यानंतर मृगशीर्ष नक्षत्र योग : ध्रुव योग (सकाळी ०९:०१ पर्यंत) त्यानंतर व्याघात योग करण : विस्ती भद्रा करण (दुपारी ०१:५९ पर्यंत) त्यानंतर भाव करण

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## क्रांतिदिनी पुण्यात अश्वारूढ तिरंगा यात्रा

**पुणे :** स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रभक्तीच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी क्रांतिदिनानिमित्त पुण्यात अश्वारूढ तिरंगा यात्रा संचलन आयोजित करण्यात आले आहे. दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकादमीतर्फे रविवारी (ता. ९) सकाळी ७.३० वाजता हे संचलन होणार असल्याची माहिती अकादमीचे अध्यक्ष गुणेश पुरंदरे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ वर्ष - १ अंक - ३११ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

# सत्ता हातातून गेल्यावर भाजप आमदाराची धार्मिक चिथावणी?

## मुस्लिम आयएएस अधिकाऱ्याला 'पाकिस्तानी' म्हणणाऱ्या वक्तव्यावर उच्च न्यायालयाचा कडक चाबूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र
**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

कर्नाटकातील सत्ता गमावल्यानंतर विरोधी पक्षाच्या भूमिकेत असलेल्या भाजपच्या एका आमदाराच्या धार्मिक स्वरूपाच्या वक्तव्यावर कर्नाटक उच्च न्यायालयाने कठोर शब्दांत ताशेरे ओढले आहेत. केवळ ती मुस्लिम आहे म्हणून तुम्ही तिला पाकिस्तानी म्हणू शकत नाही. ती कर्नाटक राज्याची आयएएस अधिकारी आहे, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत न्यायालयाने राजकीय नेत्यांच्या बेजबाबदार वक्तव्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

प्रकरण भाजपचे विधान परिषदेचे सदस्य (MLC) एन. रविकुमार यांच्याशी संबंधित आहे. मे २०२५ मध्ये कलबुर्गी येथे भाजपच्या आंदोलनादरम्यान त्यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी फौझिया तरन्नुम यांच्याबाबत त्या पाकिस्तानी आहेत का? असा वादग्रस्त प्रश्न उपस्थित केला होता. या वक्तव्यामुळे धार्मिक भावना दुखावणे, समाजात तेढ निर्माण करणे आणि सार्वजनिक सेवेत असलेल्या अधिकाऱ्याचा अपमान केल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हा गुन्हा रद्द करण्यासाठी



रविकुमार यांनी कर्नाटक उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, ७ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या भूमिकेवर कठोर प्रश्न उपस्थित केले.

रविकुमार यांच्या वकिलांनी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची माफी मागितल्याचा युक्तिवाद केला. मात्र, न्यायालयाने तो फेटाळत स्पष्ट शब्दांत सांगितले की, केवळ माफी मागितल्याने अशा विधानाचा परिणाम नाहीसा होत नाही.

यावेळी न्यायालयाने केवळ या प्रकरणापुरते मर्यादित न राहता देशातील राजकीय संस्कृतीवरही भाष्य केले. तुम्ही लोक तुमच्या जिभेवर नियंत्रण का ठेवत नाही? अशा फालतू खटल्यांमुळे गुन्हेगारी न्यायालये तुंबली आहेत. खून, खंडणी आणि गंभीर गुन्ह्यांचे खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात; पण राजकीय नेत्यांच्या अशा बेजबाबदार विधानांमुळे न्यायालयांचा मौल्यवान वेळ वाया जात आहे, अशी कठोर टिप्पणी न्यायालयाने केली.

इतकेच नव्हे तर, कोणताही पक्ष असो, एकमेकांवर चिखलफेक करणे थांबवा. धोरणे, विकास, बेरोजगारी, महागाई किंवा जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी वैयक्तिक आणि धार्मिक पातळीवरील आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. जनतेला तुमच्या राजकीय भांडणांमध्ये रस नाही; त्यांना स्वतःच्या कल्याणाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे हवी आहेत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणाची पुढील सुनावणी २० ऑगस्ट २०२६ रोजी होणार असून, आंदोलनासाठी देण्यात आलेल्या परवानगीसंदर्भातील मूळ कागदपत्रे सादर करण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

हे प्रकरण केवळ एका राजकीय वक्तव्यापुरते मर्यादित नसून, सार्वजनिक पदावरील अधिकाऱ्यांविषयी धार्मिक ओळख जोडून केलेल्या विधानांकडे न्यायव्यवस्था किती गंभीरतेने पाहते, याचे ठळक उदाहरण मानले जात आहे.

न्यायालयाच्या स्पष्ट शब्दांमुळे राजकीय टीका आणि धार्मिक द्वेषपूर्ण वक्तव्य यांच्यातील सीमारेषा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## सारांश वृत्त

### लोकसभेत काँग्रेसचं शक्तीप्रदर्शन? सर्व खासदारांना 'थ्री-लाईन व्हीप' जारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधी पक्ष आणि सत्ताधारी आघाडी आमनेसामने येण्याची चिन्हे दिसत आहेत. लोकसभेत शक्ती प्रदर्शन करण्यासाठी आणि महत्त्वाच्या विधेयकांवर पक्षाची भूमिका ठामपणे मांडण्यासाठी काँग्रेसने आक्रमक पाऊल उचलले आहे. काँग्रेसने शुक्रवारी आपल्या सर्व लोकसभा खासदारांना 'थ्री-लाईन व्हीप' जारी केला आहे. यानुसार, सर्व खासदारांना १०, ११ आणि १२ ऑगस्ट रोजी सभागृहात उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

लोकसभेतील काँग्रेस संसदीय दलाचे मुख्य सचेतक अथवा Chief Whip कोडिकुन्निल सुरेश यांनी हे निर्देश दिले आहेत. या पत्रात म्हणण्यात आले आहे की, सोमवार (१० ऑगस्ट), मंगळवार (११ ऑगस्ट) आणि बुधवार (१२ ऑगस्ट) या तीन दिवसांत लोकसभेत अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. यामुळे सर्व खासदारांनी सकाळी ११ वाजल्यापासून सभागृहाचे कामकाज स्थगित होईपर्यंत उपस्थित राहून पक्षाच्या भूमिकेला पाठिंबा देणे बंधनकारक आहे. कोणत्याही परिस्थितीत अनुपस्थित राहणे खपवून घेतले जाणार नाही.

दरम्यान, केंद्र सरकार अर्थात सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीनेही आपल्या सर्व खासदारांना सोमवारपासून (१० ऑगस्ट) राजधानी दिल्लीतच उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, अद्याप कोणताही व्हीप जारी करण्यात आलेला नाही. संसदेत परकीय योगदान (नियमन) सुधारणा विधेयक किंवा एफसीआरए दुरुस्ती विधेयक आणले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे विधेयक मांडणे, त्यावर चर्चा करणे आणि ते मंजूर करून घेणे, या पार्श्वभूमीवर, सत्ताधारी आणि विरोधक यांच्या या तयारीकडे बघितले जात आहे.

दरम्यान देशभरात सध्या ई-२० पेट्रोलवरुन सरकारवर ताशेरे ओढले जात आहेत. ई-२० किंवा त्यापेक्षा जास्त इथेनॉल असलेल्या पेट्रोलमुळे गाड्यांचे इंजिन खराब होत असल्याचा दावा केला जातोय. सरकारने मात्र हे आरोप फेटाळून लावलेले आहेत. आता लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर सडकून टीका केलीय.

## लोकप्रतिनिधीवर गंभीर आरोप; हायकोर्टाचा कठोर निर्णय! रमेश म्हात्रेंना जामीन, पण चार्जशीटपर्यंत महाराष्ट्रात प्रवेशबंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
**मुंबई : । वृत्तसंस्था**

कल्याण-डोंबिवली महानगर-पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर कथित हल्ला प्रकरणात शिवसेनेचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांना मुंबई उच्च न्यायालयाने कठोर अटींसह जामीन मंजूर केला आहे. मात्र, दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल होईपर्यंत त्यांनी महाराष्ट्राबाहेरच राहावे, असा अभूतपूर्व आदेश देत न्यायालयाने या प्रकरणाच्या गांभीर्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

कार्यकारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने यापूर्वी जामिनाला दिलेली स्थगिती उठवली. त्याचवेळी, हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्याचे आदेश देत तपास आणि न्यायप्रक्रियेसाठी स्पष्ट कालमर्यादाही निश्चित केली.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवत म्हटले की, लोकप्रतिनिधी हा लोकांचा आणि लोकांसाठी असतो. अशा व्यक्तीवर स्वतःच्याच मतदारांवर हल्ल्याचा आरोप होणे ही लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांसाठी गंभीर बाब आहे.

या प्रकरणात ६ जुलै २०२६ रोजी डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर कथित हल्ला झाल्यानंतर रमेश म्हात्रे यांना अटक करण्यात आली होती. सत्र न्यायालयाने १४ जुलै रोजी जामीन मंजूर केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत जामिनाला स्थगिती दिली होती. त्यानंतर म्हात्रेंनी शरणागती पत्करून न्यायालयीन कोठडी स्वीकारली.

आता न्यायालयाने तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे निर्देश देतानाच, १५ कामकाजाच्या दिवसांत न्यायवैद्यक अहवाल, १० दिवसांत चार्जशीट आणि त्यानंतर पाच दिवसांत आरोप निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत.

म्हात्रे यांनी खटला सुरू होईपर्यंत गोव्यात राहून दर आठवड्याला अंजुना पोलीस ठाण्यात हजेरी लावावी, तसेच पीडित, साक्षीदार किंवा संबंधित व्यक्तींशी कोणताही संपर्क साधू नये, अशा कठोर अटीही न्यायालयाने घातल्या आहेत. अटींचे उल्लंघन झाल्यास जामीन तत्काळ रद्द करण्याचा इशाराही न्यायालयाने दिला आहे.

## 'स्वस्त प्रसिद्धी' म्हणत याचिका फेटाळली; मग माजी न्यायमूर्तींवरील गंभीर आरोपांची फौजदारी चौकशी कोण करणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात एफआयआर आणि एसआयटी चौकशीची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने 'स्वस्त प्रसिद्धी'साठी दाखल करण्यात आल्याचे नमूद करत फेटाळली. मात्र या निर्णयानंतर एक महत्त्वाचा सार्वजनिक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहेगंभीर आरोपांना सामोरे गेलेल्या माजी न्यायाधीशांविरुद्ध फौजदारी चौकशीची प्रक्रिया नेमकी कशी आणि कोणाच्या माध्यमातून पुढे जाणार?

न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या हेतूंवर



प्रश्नचिन्ह उपस्थित केले असले, तरी त्यामुळे मूळ आरोपांबाबतचा सार्वजनिक प्रश्न आपोआप संपत नाही. संसदेत महाभियोगाची प्रक्रिया सुरू झाली,

त्यानंतर संबंधित न्यायाधीशांनी राजीनामा दिलाया घडामोडींनंतर पुढील कायदेशीर पाऊल काय असावे, याबाबत स्पष्टता अपेक्षित असल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

म्हणून या प्रकरणातून उपस्थित होणारा खरा मुद्दा न्यायालयाने कुणाला वाचवले हा नसून, न्यायाधीशांविरोधातील गंभीर आरोपांची स्वतंत्र, पारदर्शक आणि विश्वासार्ह फौजदारी चौकशी करण्यासाठी विद्यमान कायदेशीर यंत्रणा पुरेशी आहे का, हा आहे. हा प्रश्न सार्वजनिक विश्वासाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा ठरतो.

## 'ओबीसी जागेवर लढणाऱ्यांना माझा पाठिंबा नाही'; जरांगेंचा यू-टर्न की नवी भूमिका? शिंदेंवर पुन्हा जोरदार हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
**धाराशिव । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी आरक्षण आणि निवडणुकांबाबत महत्त्वाचे विधान करत राजकीय चर्चांना नवे वळण दिले आहे. कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसी आरक्षित जागेवर निवडणूक लढणाऱ्यांना माझा कधीच पाठिंबा नव्हता आणि नाही, असे स्पष्ट करत त्यांनी आपली भूमिका पुन्हा अधोरेखित केली.

जरांगे म्हणाले की, मी राजकारणासाठी नाही, तर गरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून लढत आहे. व्हॅलिडीटी असेल तरच निवडणुकीच्या भानगडीत पडा, असा माझा समाजाला नेहमी सल्ला असतो. त्यांनी महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्यांपासून स्वतःला समान अंतरावर ठेवत, मी कोणाचाही मिंधा नाही; माझ्यासाठी समाजहित सर्वात महत्त्वाचे आहे, असेही स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर पुन्हा जोरदार टीका केली. प्रमाणपत्रे रद्द करण्याचा प्रयत्न झाला तर मला कोणत्याही मैत्रीची गरज नाही. माझा समाजच माझ्यासाठी सर्वात महत्त्वाचा आहे, असे म्हणत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. आमच्या मुलांचे भवितव्य धोक्यात घालणारे निर्णय आम्ही कधीही स्वीकारणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, भाजप नेते प्रसाद लाड यांच्या भूमिकेचे जरांगेंनी कौतुक केले. तसेच, मराठा समाजाच्या कुणबी प्रमाणपत्रांवर गदा आणण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही, असा ठाम निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

## 'आरक्षण केवळ उत्पन्नावर ठरत नाही'; सर्वोच्च न्यायालयात केंद्र सरकारची ठाम भूमिका, आर्थिक उप-आरक्षणाला विरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणामध्ये उत्पन्नाच्या निकषावर स्वतंत्र उप-आरक्षण (सब-कोटा) देण्याच्या मागणीला केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात ठाम विरोध केला आहे. आरक्षणाचा पाया केवळ आर्थिक स्थिती नसून ऐतिहासिक अन्याय, सामाजिक मागासलेपणा आणि संरचनात्मक भेदभाव आहे, अशी स्पष्ट भूमिका केंद्राने प्रतिज्ञापत्राद्वे मांडली आहे.

सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात केंद्र सरकारने नमूद केले की, भारतीय राज्यघटनेत एससी, एसटी आणि ओबीसी समाजाला दिलेले आरक्षण हे शतकानुशतके झालेल्या सामाजिक व शैक्षणिक वंचिततेची भरपाई करण्यासाठी आहे. त्यामुळे केवळ उत्पन्न हा निकष लावून या आरक्षण व्यवस्थेत उप-कोटा निर्माण करणे राज्यघटनेच्या मूळ तत्त्वांशी सुसंगत ठरणार नाही.

ही भूमिका अशा याचिकेच्या विरोधात मांडण्यात आली आहे, ज्यामध्ये आरक्षित प्रवर्गांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी स्वतंत्र उप-कोटा तयार करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, केंद्राने स्पष्ट केले की आर्थिक दुर्बलता आणि सामाजिक मागासलेपणा या दोन स्वतंत्र संकल्पना आहेत आणि आरक्षणाची विद्यमान रचना सामाजिक न्यायाच्या घटनात्मक तत्त्वांवर आधारित आहे.

केंद्राने न्यायालयाला सांगितले की, आरक्षणाचा उद्देश केवळ आर्थिक मदत देणे नसून प्रतिनिधित्वाची समान संधी, ऐतिहासिक भेदभावाचे निराकरण आणि सामाजिक समावेशकता सुनिश्चित करणे हा आहे. त्यामुळे आरक्षणाचे स्वरूप बदलताना केवळ उत्पन्न हा एकमेव निकष ठरू शकत नाही.

या प्रकरणावरील सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय भविष्यातील आरक्षण धोरणावर दूरगामी परिणाम करू शकतो. विशेषतः आरक्षणातील अंतर्गत वर्गीकरण, सामाजिक न्याय आणि आर्थिक निकष यांवरील राष्ट्रीय चर्चेला या सुनावणीमुळे नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

## नाशिकात ४०० कोटींचे संस्कृत विद्यापीठ; फडणवीसांची शिक्षण क्षेत्रातील वाढती सक्रियता केंद्रातील मोठ्या भूमिकेची तयारी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय ज्ञानपरंपरा, संस्कृत, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डेटा सायन्स यांचा संगम घडविणाऱ्या केंद्रीय संस्कृत विद्यापीठाच्या नाशिक परिसरासाठी १६.८० हेक्टर जमिनीचा ७/१२ उतारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे सुपूर्द केला. या कार्यक्रमात त्यांनी नाशिकला देशातील अग्रगण्य शैक्षणिक आणि संशोधन केंद्र बनविण्याची भूमिका मांडली. मात्र या घोषणेनंतर राजकीय वर्तुळात एक वेगळी चर्चा सुरू झाली आहेफडणवीस शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय अजेंडा अधिक ठळकपणे मांडत आहेत का?

मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांनी यापूर्वी पायाभूत सुविधा, उद्योग, गुंतवणूक आणि तंत्रज्ञान यांवर भर दिला होता. आता त्यांच्या भाषणांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP), भारतीय ज्ञानपरंपरा, संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स आणि उच्च शिक्षण यांचा वाढता उल्लेख दिसून येत आहे. नाशिकमधील प्रस्तावित केंद्रीय संस्कृत विद्यापीठ हा त्याच दिशेने टाकलेला महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे ४०० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून, संस्कृत माध्यमातून बी.टेक. (AI आणि Data Science) सारखे अभिनव अभ्यासक्रम सुरू करण्याची योजना आहे. अशा प्रकारच्या शिक्षण मॉडेलला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यापूर्वी पाठिंबा दर्शविला आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, राष्ट्रीय पातळीवरील शिक्षण, संशोधन आणि भारतीय ज्ञानपरंपरेशी संबंधित विषयांवर सातत्याने भूमिका मांडल्यामुळे फडणवीस यांची प्रतिमा केवळ राज्यापुरती मर्यादित राहत नाही. त्यामुळे भविष्यात केंद्राच्या धोरणात्मक चर्चांमध्ये त्यांची भूमिका अधिक प्रभावी होऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत असते.

तथापि, फडणवीस केंद्र सरकारमध्ये शिक्षणमंत्री होण्यास इच्छुक आहेत किंवा त्यासाठी प्रयत्न करत आहेत, असा कोणताही अधिकृत पुरावा किंवा सार्वजनिक विधान उपलब्ध नाही. त्यामुळे असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. सध्याची घोषणा ही राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या शिक्षण प्रकल्पाच्या अंमलबजावणीशी संबंधित आहे.

या निमित्ताने मात्र एक प्रश्न नक्की उपस्थित होतोमहाराष्ट्रातील शिक्षण, संशोधन आणि भारतीय ज्ञानपरंपरेशी संबंधित मोठ्या प्रकल्पांवर मुख्यमंत्री स्वतः लक्ष केंद्रित करत आहेत, हे केवळ राज्याच्या विकासासाठी आहे की राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राला अग्रस्थानी आणण्याचा व्यापक प्रयत्न आहे?

या प्रश्नांची उत्तरे पुढील काळात फडणवीस यांची भूमिका, केंद्राशी असलेला समन्वय आणि शिक्षण क्षेत्रातील आगामी निर्णयांमधून अधिक स्पष्ट होतील.

सध्या उपलब्ध तथ्यांच्या आधारे एवढेच म्हणता येईल की, त्यांनी शिक्षण आणि संशोधनाला प्राधान्य दिले आहे; परंतु त्यावरून केंद्रातील शिक्षणमंत्रीपदाची महत्त्वाकांक्षा असल्याचा निष्कर्ष काढणे तथ्याधारित ठरणार नाही.

## संपादकीय

### वैद्यकीय शिक्षणाची सरमिसळ की आरोग्य व्यवस्थेचा नवा प्रयोग? उत्तरांची गरज सरकारनेच पूर्ण करावी

महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेशी संबंधित एका निर्णयामुळे डॉक्टर, वैद्यकीय शिक्षक, विद्यार्थी आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात व्यापक चर्चा सुरू झाली आहे. होमिओपॅथी पदवीधारकांना अतिरिक्त प्रशिक्षणानंतर आधुनिक वैद्यकातील काही सेवा देण्यासंदर्भातील निर्णयावर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

या चर्चेकडे एलोपॅथी विरुद्ध होमिओपॅथी अशा वादाच्या चौकटीत पाहणे चुकीचे ठरेल. हा विषय प्रत्यक्षात रुग्णांची सुरक्षितता, वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, नियामक संस्थांची भूमिका आणि सार्वजनिक धोरणातील पारदर्शकता यांच्याशी संबंधित आहे.

राज्यातील ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता असल्याचे सरकार वारंवार सांगते. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची तसेच तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असल्याची बाब विविध अधिकृत अहवालांतही अधोरेखित झाली आहे. त्यामुळे आरोग्यसेवा अधिक उपलब्ध करून देण्यासाठी पर्यायी उपाय शोधण्याची गरज नाकारता येणार नाही.

मात्र याच ठिकाणी काही मूलभूत प्रश्न निर्माण होतात.

हा निर्णय घेण्यापूर्वी राज्य सरकारने कोणत्या तज्ज्ञ समितीचा अभ्यास केला?

राष्ट्रीय वैद्यकीय आयोग **(NMC),** राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ किंवा इतर संबंधित नियामक संस्थांची अधिकृत मते विचारात घेण्यात आली होती का?

जर असा अभ्यास आणि सल्लामसलत झाली असेल, तर त्याचे अहवाल सार्वजनिक का करण्यात येत नाहीत?

वैद्यकीय शिक्षणातील विविध शाखांची अभ्यासक्रम रचना, प्रशिक्षणाचा कालावधी, क्लिनिकल अनुभव आणि परवाना प्रणाली वेगवेगळी असते. त्यामुळे कोणत्याही शाखेला अतिरिक्त अधिकार देण्याचा निर्णय हा केवळ प्रशासकीय नसून वैज्ञानिक पुराव्यावर आधारित असणे आवश्यक आहे.

यामध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उत्तरदायित्व.

जर विस्तारित अधिकारांच्या चौकटीत उपचारादरम्यान गंभीर वैद्यकीय चूक झाली, तर जबाबदारी कोणाची असेल? उपचार करणाऱ्या डॉक्टरची, प्रशिक्षण संस्थेची की परवानगी देणाऱ्या शासनाची? या संदर्भात स्पष्ट धोरण जाहीर करण्यात आले आहे का?

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील मूळ समस्या डॉक्टरांची कमतरता आहे, हे वास्तव आहे. पण त्यावर दीर्घकालीन उपाय म्हणून रिक्त पदे भरणे, ग्रामीण सेवेसाठी प्रोत्साहन वाढवणे, पायाभूत सुविधा सुधारणे आणि विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देणे यालाही तितकेच महत्त्व आहे. त्यामुळे पर्यायी उपाय राबविताना त्यांचे वैज्ञानिक मूल्यमापन आणि संभाव्य परिणाम यांचेही स्पष्ट सादरीकरण आवश्यक ठरते.

या विषयावर मतभेद असू शकतात. काही तज्ज्ञांना हा निर्णय ग्रामीण आरोग्यसेवेसाठी उपयुक्त वाटू शकतो, तर काहीजण रुग्ण सुरक्षेच्या दृष्टीने सावधगिरी बाळगण्याची गरज व्यक्त करतात. अशा परिस्थितीत शासनाने सर्व संबंधित बाजूंचे मत, उपलब्ध वैज्ञानिक पुरावे आणि निर्णयामागील कारणमीमांसा पारदर्शकपणे जनतेसमोर मांडणे ही लोकशाहीतील अपेक्षित प्रक्रिया आहे.

आरोग्य क्षेत्रातील कोणताही निर्णय हा विश्वासावर उभा असतो. आणि विश्वास निर्माण होतो तो पारदर्शकता, वैज्ञानिक पुरावे आणि उत्तरदायित्व यांमधून.

म्हणून आजचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न कोणत्या वैद्यकीय शाखेचा नाही.

प्रश्न एवढाच आहे रुग्णांच्या सुरक्षिततेशी संबंधित निर्णय घेताना सरकारने कोणत्या वैज्ञानिक अभ्यासावर आणि कोणत्या तज्ज्ञांच्या शिफारशींवर विश्वास ठेवला?

## महापौरांचा सेक्टर २२ दौरा; पूरप्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना, पीसीएमसी कॉलनी दुरुस्तीचे आश्वासन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

निगडी येथील सेक्टर २२ परिसरातील दरवर्षी उद्भवणाऱ्या पूरस्थितीची पाहणी करण्यासाठी महापौरांनी शुक्रवारी विशेष दौरा केला. यावेळी पूरप्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबरोबरच पीसीएमसी कॉलनीची दुरुस्ती करण्याचे आश्वासन त्यांनी नागरिकांना दिले.

प्रभाग क्रमांक १३ मधील निगडी सेक्टर २२, संग्रामनगर झोपडपट्टी, श्रमिकनगर, राहुलनगर, फातिमा मशिद परिसर तसेच १ ते १५ क्रमांकाच्या इमारतींमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते.

अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांच्या घरगुती साहित्याचे, कपडे आणि अन्नधान्याचे दरवर्षी मोठे नुकसान होत असून स्थानिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राहुलनगर ते निगडी स्मशानभूमीपर्यंत कॅन्टोन्मेंट आणि लष्करी माळरानावरून येणाऱ्या पावसाच्या पाण्याचा प्रवाह



नियोजनबद्ध पद्धतीने वळविण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना परिसराची पाहणी करून तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पीसीएमसी कॉलनीच्या दुरुस्तीची कामेही प्राधान्याने हाती घेतली जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. महापौरांच्या या दौऱ्यामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत कायमस्वरूपी तोडग्याची अपेक्षा व्यक्त केली.

## अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर प्रशासन सकारात्मक; पदोन्नती, जुनी पेन्शनसह विविध विषयांवर लवकर निर्णय : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवा विषयक प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, विविध मागण्यांची टप्प्याटप्प्याने पूर्तता करण्यासाठी संबंधित विभागांनी कार्यवाही गतिमान करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने कामगार कल्याण विभागाच्या वतीने आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.



बैठकीला अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, उपायुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप तसेच कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे आणि महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, सेवा ज्येष्ठता, जुनी पेन्शन योजना, सेवा प्रवेश नियम, आकृतीबंध, धन्वंतरी योजना, आश्वासित प्रगती योजना, १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतरचे लाभ, आगाऊ वेतनवाढ, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज आदी विविध प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

याशिवाय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या बोनसबाबतचा करार लवकरात लवकर अंतिम करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक प्रश्न नियमांच्या चौकटीत आणि निश्चित कालावधीत निकाली काढण्यासाठी प्रशासन आवश्यक कार्यवाही करत आहे. प्रत्येक मागणीचा वस्तुनिष्ठ विचार करून ज्या बाबींवर निर्णय घेणे शक्य आहे, त्या प्रकरणांमध्ये कोणताही अनावश्यक विलंब होऊ दिला जाणार नाही. संबंधित विभागांनी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करून कर्मचारी हिताचे प्रश्न मार्गी लावावेत.

## माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांच्या हस्ते उद्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव; राज्यस्तरीय समाज गौरव पुरस्कार सोहळा पिंपरीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

लिंगायत गवळी विकास फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने शनिवारी (दि. ८) पिंपरी येथे राज्यस्तरीय 'समाज गौरव पुरस्कार – २०२६' सोहळा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री व राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या हस्ते होणार आहे.

सकाळी ११ वाजता संत तुकाराम नगर, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे कार्यक्रम होणार असून, यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील मान्यवर बंधू-भगिनींना 'समाज गौरव पुरस्कार – २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना करिअर मार्गदर्शनही केले जाणार आहे.

कार्यक्रमास महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हिरामण गवळी, कार्यकारी अध्यक्ष वसंत नामागवळी, प्रा. भालचंद्र हुच्चे, खंडू बहिरवाडे, उमाकांत जोमीवाले, नगरसेविका अरुणाताई लंगोटे, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, प्रदेश युवक अध्यक्ष प्रवीण हुंडीवाले, सुपाआप्पा पिरनाईक, डॉ. किसन झिपरे, सुरेश शहापूरकर, बंटीभाऊ घुगरे, कृष्णभाऊ गठरी, सोमनाथ हिरणवळे, उद्योजक भगवान औशीकर, प्रदेश उपाध्यक्ष अनिल नायकू यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## पीसीएमसी स्थायी समितीची मोठी मंजुरी; वायसीएम रुग्णालयातील ११ मजली इमारतीला 'वायसीएम विद्या सदन' नाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीने यशवंतराव चव्हाण मेमोरियल (वायसीएम) रुग्णालय परिसरातील नव्याने उभारण्यात आलेल्या ११ मजली इमारतीचे नामकरण 'वायसीएम विद्या सदन' असे करण्यास मंजुरी दिली आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

महापालिकेच्या वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ही इमारत महत्त्वपूर्ण ठरणार असून, येथे नर्सिंग शिक्षण, ग्रंथालय आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी निवासी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

इमारतीच्या तिसऱ्या, चौथ्या आणि सहाव्या मजल्यावर ६० विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे बीएससी नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यात आले असून, १ सप्टेंबर २०२५ पासून येथे नियमित शैक्षणिक कामकाज सुरू आहे.

सहाव्या आणि सातव्या मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच आठवा, नववा आणि दहावा मजला एमडी (चृ) आणि एमएस (चड) अभ्यासक्रमाच्या १४७ पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह म्हणून विकसित करण्यात आला आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या १६ जुलै २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार बीएससी नर्सिंग महाविद्यालयाला मान्यता मिळाली होती. त्यानंतर महापालिकेने शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधा विस्ताराच्या दृष्टीने या इमारतीचा वापर सुरू केला असून, आता तिला 'वायसीएम विद्या सदन' हे अधिकृत नाव देण्यात आले आहे.



या निर्णयामुळे वायसीएम रुग्णालयातील वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा अधिक बळकट होण्यास मदत होणार असल्याचे महापालिका प्रशासनाने म्हटले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांनी जाणून घेतले अग्निसुरक्षेचे महत्त्व; मोशी अग्निशमन केंद्रात प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत मोशी येथील सिटी प्राईड स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी मोशी अग्निशमन केंद्रात अग्निसुरक्षा साहित्य प्रदर्शन आणि प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमात अग्निशमन जवानांनी विद्यार्थ्यांना अग्निशमन विभागाच्या कार्यपद्धतीची माहिती देत आग विझविण्यासाठी वापरली जाणारी विविध उपकरणे, बचाव साहित्य, अग्निशमन वाहनांची वैशिष्ट्ये आणि त्यांचा प्रत्यक्ष वापर याचे प्रात्यक्षिक सादर केले.

तसेच आग लागल्यास घ्यावयाची खबरदारी, आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षितपणे बाहेर पडण्याच्या पद्धती, प्राथमिक उपाययोजना तसेच तातडीच्या मदतीसाठी अग्निशमन विभागाच्या १०१ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी अग्निशमन वाहनांची प्रत्यक्ष पाहणी करत विविध अग्निसुरक्षा साहित्याची माहिती जाणून घेतली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारले असून अग्निशमन जवानांनी त्यांची सविस्तर उत्तरे दिली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद देण्याबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. शालेय स्तरावर अग्निसुरक्षेची संस्कृती रुजविण्यासाठी महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत अशा प्रकारचे जनजागृती उपक्रम यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना : ७ मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांच्या खात्यात आर्थिक मदतीची रक्कम जमा

■ **पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून जलद गतीने सुरू आहे. महापौर रवि लांडगे यांच्या निर्देशानुसार आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्यात येत असून, कागदपत्रांची पूर्तता झालेल्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येत असल्याची माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.

> मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात येत आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच पात्र वारसांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम थेट जमा केली जात आहे. उर्वरित लाभार्थ्यांची कागदपत्रे प्राप्त होताच त्यांनाही विलंब न लावता आर्थिक मदत वितरित करण्यात येईल.
>
> **– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

> मोशी दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना शक्य तितक्या लवकर आर्थिक दिलासा मिळावा, ही महानगरपालिकेची भूमिका आहे. कोणत्याही मृत कर्मचाऱ्याच्या वारसांना मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागू नये, यासाठी प्रशासनाला आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उर्वरित मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांची आवश्यक कागदपत्रे प्राप्त होताच नियमानुसार आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जाईल.
>
> **– रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

आतापर्यंत मृत अक्षय सावंत (वय ३५), सन्नी माने (वय ३९), राहुल गायकवाड (वय ३५), वामन कसबे (वय ३५), नागेश गायकवाड (वय २६), सुनील कोरके (वय ४०) आणि रणजीत पाटील (वय २२) यांच्या कायदेशीर वारसांच्या बँक खात्यात प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत नियमानुसार थेट जमा करण्यात आली आहे.

दुर्घटनेतील मृत भावेश वाणी आणि महेश कुंभार यांच्या कायदेशीर वारसांच्या कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नसल्याने त्यांच्या बँक खात्यात आर्थिक मदतीची रक्कम जमा होऊ शकलेली नाही.

संबंधित कागदपत्रे प्राप्त होताच आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या वारसांच्या खात्यातही नियमानुसार आर्थिक मदतीची रक्कम तातडीने जमा करण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# पुणे-मंचर-नाशिक रेल्वेसाठी रविवारी मंचरमध्ये रास्ता रोको; कृती समितीची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

पुणे-मंचर मार्गे नाशिक रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी रविवारी (दि. ९) क्रांती दिनानिमित्त सकाळी ९ वाजता मंचर बसस्थानकासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा पुणे-नाशिक रेल्वे कृती समितीने केली आहे. आंदोलनाच्या नियोजनासाठी मंचर (ता. आंबेगाव) येथील तपनेश्वर मंदिरात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीत पुणे-नाशिक रेल्वेचा प्रस्तावित मार्ग अहिल्यानगरमार्गे नेण्याच्या हालचालींवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. पुणे-मंचर-संगमनेर-सिन्नर या मार्गाने रेल्वेची दीर्घकाळापासून मागणी होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप उपस्थितांनी केला.

आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक येथील पुणे-नाशिक रेल्वे कृती समितीचे उपाध्यक्ष राजेंद्र चौधरी व कार्याध्यक्ष संतोष फापाळे यांच्या नेतृत्वाखाली खेड, आंबेगाव, जुन्नर, संगमनेर आणि सिन्नर तालुक्यांत क्रांती दिनी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करून केंद्र सरकारचे लक्ष वेधण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

बैठकीस रेल्वे कृती समितीचे आंबेगाव तालुकाध्यक्ष व निमंत्रक बाबाजी चासकर, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम, जिल्हा संघटक राजाराम बाणखेले, सचिन बांगर, अजित चव्हाण, विशाल वाबळे, नगरसेवक वसंतराव बाणखेले, दादाभाऊ थोरात, ॲड. राजू बेंडे पाटील यांच्यासह तालुक्यातील अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

शांततेच्या मार्गाने आंदोलनाचा निर्धार

पुणे-मंचर-नाशिक रेल्वेमार्ग हा या संपूर्ण भागाच्या विकासाचा कणा आहे. जनभावनेचा आदर करून शासनाने या मार्गाला तातडीने मंजुरी द्यावी.

रविवारी होणारे आंदोलन मंचर येथे शांततापूर्ण, लोकशाही मार्गाने आणि व्यापक जनसहभागातून यशस्वी करण्यात येईल, असे आवाहन रेल्वे कृती समितीचे निमंत्रक बाबाजी चासकर यांनी केले.




## सारांश वृत्त

### काँग्रेस कार्यकर्त्यांना धमकीच्या वक्तव्यावरून आमदार सुनील शेळके यांच्याविरोधात युवक काँग्रेस आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मावळ : प्रतिनिधी

